पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ६२ /२०२४ दि. ०५ /०४/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, नौपाडा** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. ०९/०४/२०२४ रोजी **'गुढीपाडवा'** सणानिमित्त श्री कौपीनेश्वर सांस्कृतिक न्यास, नववर्ष स्वागतयात्रा २०२४ आयोजित करण्यात आलेले आहे. यात्रेनिमित्त भाविकांची गर्दी होणार असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) डॉ. मुस चौक कडून हॉटेल साई कृपा कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **डॉ. मुस चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने जांभळी नाका, चिंतामणी चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) अल्मेडा व वंदना टी पॉईट कडून गजानन महाराज चौक मार्गे राम मारूती रोडने गोखले रोड कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना अल्मेडा चौक येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** खोपट कडून अल्मेडा चौक मार्गे ठाणे स्टेशन कडे जाणारी वाहने खोपट येथून चरई कट टेंभी नाका मार्गे इच्छीत स्थळी जातील. तसेच वंदना टी पॉईट कडून अल्मेडा चरई कट टेंभी नाका मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) गोखले रोड कडून राम मारूती रोडने पु. ना. गाडगीळ चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **गोखले रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने तीन हात नाका मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) टॉवर नाका कडून गडकरी सर्कल कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **टॉवर नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने टेंभी नाका मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) तीन हात नाका कडून हरिनिवास मल्हार मार्गे ठाणे स्टेशन कडे जाणाऱ्या सर्व टी.एम.टी., ठाणे परिवहन सेवेच्या बसेसना **तीन हात नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सर्व टी.एम.टी., ठाणे परिवहन सेवेच्या बसेस नितिन कंपनी, टी.एम.सी. सर्कल, अल्मेडा सिग्नल येथून डावे वळण घेवून खोपट टेंभी नाका मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ६) खोपट कडून अल्मेडा, पु. ना. गाडगीळ मार्गे ठाणे स्टेशन कडे जाणाऱ्या सर्व प्रकारची जड अवजड वाहने, एस.टी. महामंडळाच्या बसेसना **अल्मेडा चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने खोपट कडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील. तसेच अल्मेडा टी.एम.सी. सर्कल, नितिन कंपनी मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ७) नितिन कंपनी व अल्मेडा कडून टी.एम.सी., हरिनिवास मार्गे गोखले रोडने ठाणे स्टेशन कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **हरिनिवास सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने हरिनिवास, तीन पेट्रोल पंप कडून वंदना, अल्मेडा चौक येथून खोपट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**नो पार्किंग –** १) चिंतामणी चौक ते गडकरी सर्कल तलावाची बाजू व सेंट जॉन स्कूल मागील बाजूस रस्त्याचे दोन्ही बाजूस कोणत्याही प्रकारची वाहने पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

२) गजानन महाराज चौक ते गोखले रोड दरम्यान राम मारूती रोडवर रस्त्याचे दोन्ही बाजूस कोणत्याही प्रकारची वाहने पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

३) साई कृपा हॉटेल ते एस.बी.आय. कॉर्नर दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस कोणत्याही प्रकारची वाहने पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदर वाहतूक अधिसूचना दि. ०९/०४/२०२४ रोजी सकाळी ०६:०० ते ११:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

<u>प्रत माहितीसाठी सादर</u>

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी,ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग व वाहतूक उप विभाग ठाणे शहर.